महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108
अंतीम परिक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर क्र. I | | मंगळवर | - 27/08/2013 |
| विषय | - भारतीय दंड विधान आणि मुंबई पोलीस अधिनियम | वेळ | - 10.30 ते 13.30 |
| | Indian Penal Code & Mumbai Police Act | गुण | - 100 |

*****************************************************************

**सुचना-**

| | | |
|---|---|---|
| अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. | -- | All questions are compulsory. |
| ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. | -- | Marks for each question are indicated there- against. |
| क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. | -- | Write legibly. Abide by word limit. |
| ड. फक्त निळया/काळया बॉलपेनचाच वापर करावा. | -- | Use blue/black ball point pen only. |
| इ. मुख्य उत्तरपत्रिकेतील पृष्ट क्र.2 वर काहीही लिहू नये | -- | Do not write anything on page 2 of main answer sheet. |

*****************************************************************

गुण / Marks

**प्र. 1 खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 40 शब्दांच्या आत द्यावे.** ( 20 )

प्र. 1 (1) 'अ' यास क्रोध चढण्यास मोठे आणि आकस्मिक कारण झाल्याने त्याने 'ब' यावर पिस्तुल झाडले. 'ब' मरण पावला. तर 'अ' ने कोणता गुन्हा केला? [3]

प्र. 1 (2) ज्या दुखापतीमुळे जीव धोक्यात येतो अथवा 20 दिवस इतका काळ दु:सह शारिरीक वेदना सहन करावी लागते किंवा त्या व्यक्तीचे व्यवसाय चालू ठेवणे अशक्य होते, त्यास कोणती दुखापत म्हणतात? [1]

प्र. 1 (3) दिवाणी दावा चालू ठेवण्यापासून 'ब' परावृत्त व्हावा यासाठी 'अ' ने 'ब' चे घर जाळण्याची धमकी दिली. तर 'अ' ने कोणता गुन्हा केला? [2]

प्र. 1 (4) भारतीय दंड विधान संहितेमध्ये किती प्रकारच्या शिक्षा प्रस्तावित केलेल्या आहेत? [1]

प्र. 1 (5) 'ब' याने 'अ' यास अतिशय क्रोध आणल्याने रागाचे आवेशात 'अ' हा 'ब' याचा भुलगा नागे 'क' यास ठार मारतो. तर 'अ' याने कोणता अपराध केला? [3]

प्र. 1 (6) 'अ' हा जाणुनबुजून 'ब' या वेडयास गुन्हा करण्यास चिथावणी देतो. 'ब' गुन्हा करतो. तर 'अ' ने काय गुन्हा केला ? [3]

प्र. 1 (7) जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एखादी अवैध कृती किंवा एखादी अवैध नसलेली कृती अवैध साधनांमार्फत करविण्याचा करार करतात त्यास काय म्हणतात? [1]

प्र. 1 (8) 'अ' हा अंशत: 'ब' यास अन्न देण्याचे अवैधपणे टाळतो व अंशत: 'ब' यास मारहाण करतो आणि उद्देशपुर्वक 'ब' याचा मृत्यू घडवून आणतो. 'अ' ने कोणता गुन्हा केलेला आहे? [2]

प्र. 1 (9) खालील पैकी दस्तऐवज कोणते? [1]

(अ) बँकेवरील धनोदश
(ब) मुखत्यारनामा
(क) गुन्हेगाराने बनवलेला नकाशा किंवा आराखडा
(ड) वरील सर्व

प्र. 1(10) गैरलाभ म्हणजे -- [1]

(अ) ज्या व्यक्तीचा कायदेशीर अधिकार नसतो अशा मालमत्तेचा कायदेशीर मार्गाने मिळविलेला लाभ.
(ब) ज्या व्यक्तीचा कायदेशीर अधिकार नसतो अशा मालमत्तेचा बेकायदेशीर मार्गाने मिळविलेला लाभ
(क) ज्या व्यक्तीचा कायदेशीर अधिकार असतो अशा मालमत्तेचा बेकायदेशीर मार्गाने मिळविलेला लाभ
(ड) वरील सर्व

प्र. 1(11) भारतीय नागरिकाने भारताबाहेर अपराध केला तर- [1]

(अ) भारतात गुन्हा केलेला नाही म्हणून भारतात कायदेशीर प्रक्रिया (केस) चालू शकणार नाही.
(ब) ज्या देशात गुन्हा घडला असेल त्याच ठिकाणी कायदेशीर प्रक्रिया (केस) सुरु होऊ शकते.
(क) ज्या ठिकाणी तो सापडला त्या ठिकाणी भारतात कायदेशीर प्रक्रिया (केस) सुरु होऊ शकते.
(ड) यापैकी नाही

प्र. 1(12) भारतीय दंड विधान संहितेतील प्रकरण 12 किंवा 17 याखाली पूर्वी दोषसिध्दी (पुर्व शिक्षा) असता वाढीव शिक्षा भा.दं.वि. च्या कोणत्या कलमा अंतर्गत दिली जाते? [1]

| | | |
|---|---|---|
| **प्र. 2** | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येकी 50 शब्द ) | ( 20 ) |
| **प्र. 2 (1)** | 'चोरी' ची व्याख्या व उदाहरणासह स्पष्टीकरण द्या. | [3] |
| **प्र. 2 (2)** | 'चोरी' [theft] व 'बलाद्ग्रहण' [extortion] यातील फरक स्पष्ट करा. | [4] |
| **प्र. 2 (3)** | 'चोरी' ही 'जबरी चोरी' केव्हा ठरते? | [3] |
| **प्र. 2 (4)** | एखादी व्यक्ती स्वतःच्याच मालमत्तेची चोरी करु शकते कां? स्पष्ट करा. | [3] |
| **प्र. 2 (5)** | 'अ' ला रोडवर मुल्यवान अंगठी सापडते. 'अ' खऱ्या मालकाचा शोध न घेता ती अंगठी ताबडतोब विकतो. 'अ' हा कोणत्या गुन्हयाखाली दोषी आहे? | [3] |
| **प्र. 2 (6)** | 'जबरी चोरी' व 'दरोडा' यातील फरक स्पष्ट करा. | [4] |
| **प्र. 3** | **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (प्रत्येकी 50 शब्द)** | ( 20 ) |
| **प्र. 3 (1)** | अपराध करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे काय? स्पष्ट करा. | [3] |
| **प्र. 3 (2)** | तयारी व प्रयत्न यातील फरक स्पष्ट करा. | [4] |
| **प्र. 3 (3)** | खुनाचा प्रयत्न करणे म्हणजे काय? | [3] |
| **प्र. 3 (4)** | कुठलिही जखम न करता एखादी व्यक्ती - खुनाचा प्रयत्न करणे या गुन्हयाखाली दोषी होऊ शकते कां? स्पष्ट करा. | [4] |
| **प्र. 3 (5)** | भारतीय दंड विधान संहितेच्या कलम 307,308, व 309 यांसोबत कलम 511 लागू शकते कां? कारणे द्या. | [2] |
| **प्र. 3 (6)** | कोलकता येथे राहणारा 'अ' हा दिल्लीमध्ये राहणाऱ्या 'ब' चा अभिकर्ता (Agent) आहे. 'ब' कडून 'अ' ला पाठवल्या जाणाऱ्या सर्व रकमा 'ब' च्या निर्देशानुसार 'अ' ने गुंतवाव्यात असा स्पष्ट करार 'अ' आणि 'ब' यांच्यामध्ये झालेला आहे. 'ब' हा 'अ' ला 20 लाख रु. 'अ' ने ते विशिष्ट कंपनीच्या रोख्यांमध्ये गुंतवावेत असे निर्देश देऊन पाठवतो. 'अ' अप्रामाणिकपणे निदेशाची अवज्ञा करतो व त्याच्या स्वतःच्या धंदयात ते पैसे घालतो. 'अ' ने कोणता गुन्हा केला? | [4] |
| **प्र. 4** | **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (प्रत्येकी 50 शब्द)** | ( 20 ) |
| **प्र. 4 (1)** | भारतीय दंड विधान संहितेत- लैंगिक अत्याचार म्हणजे काय? लैंगिक अत्याचाराच्या गुन्हयाबाबत काय शिक्षा नमूद आहेत? स्पष्ट करा. | [3] |
| **प्र. 4 (2)** | भारतीय दंड विधान संहितेतील खालील कलमे स्पष्ट करा. (प्रत्येकी 03 गुण)<br>अ) 376 (अ)    ब) 376 (ब)    क) 376 (क)<br>ड) 376 (ड)    इ) 376 (इ) | [15] |
| **प्र. 4 (3)** | भारतीय दंडविधान कलम 509 स्पष्ट करा. | [2] |
| **प्र. 5** | **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (प्रत्येकी 50 शब्द)** | ( 20 ) |
| **प्र. 5 (1)** | **फरक स्पष्ट करा.** | |
| | प्र. 5 (1) अ) सामाईक उद्देश -- समाईक इरादा | [3] |
| | प्र. 5 (1) ब) गैर विरोध -- गैर परिरोध | [3] |
| | प्र. 5 (1) क) दंगा -- मारामारी | [3] |
| **प्र. 5 (2)** | 'अ' ला गैरहानी पोहोचविण्याच्या दृष्टीने 'ब' इच्छापुर्वक 'अ' च्या मुल्यवान रोखा जाळतो. 'ब' ने कोणता अपराध केला? | [2] |
| **प्र. 5 (3)** | 'अ' च्या घराच्या भिंतीला भोक पाडून त्या भोकातून आपला हात घालून 'ब' गृह अतिक्रमण करतो तर तो कोणता अपराध करतो? | [3] |
| **प्र. 5 (4)** | फरक स्पष्ट करा - दरोडा घालण्याची पूर्वतयारी करणे - दरोडा घालण्यासाठी एकत्र जमणे. | [3] |
| **प्र. 5 (5)** | 'अ' ला ज़बर दुखापत करण्याची भीती घालून 'ब' हा 'अ' ने कोऱ्या कागदावर सही करुन किंवा आपला शिक्का करुन तो 'ब' कडे सुपूर्द करावा म्हणून त्याला अप्रामाणिकपणे प्रवृत्त करतो. 'अ' हा कागदावर सही करुन 'ब' कडे सुपूर्द करतो. अशा प्रकारे सही केलेल्या कोऱ्या कागदाचे मूल्यवान रोख्यामध्ये रुपांतर होऊ शकते. तर 'ब' ने कोणता गुन्हा केला? | [3] |

**********************************************************************************